**प्रेसनोट                    दिनांक ०७/०६/२०१९**

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर

## दाखल गुन्हयात आरोपींना अटक करुन गुन्हा उघडकिस आणुन उत्कृष्ठ कामगिरी केले बाबत...

विमानतळ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर २१८/२०१९, भा.दं.वि.कलम ३०४(अ),३४ मधील फिर्यादी रमेश लिंबाजी बनसोडे वय ५६ वर्षे रा. घर नंबर ६४ इंद्रायणी कॉलनी आर्थव पार्क तळेगांव स्टेशन ता.मावळ जि. पुणे यांनी दिनांक २९/५/२०१९ रोजी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे् येथे हजर होवुन फिर्याद दिलेत मजकुर की, त्यांचा मुलगा नामे प्रतिक रमेश बनसोडे वय २६ वर्षै हा त्याचा मित्र सागर राजेश मेहता रा. चंदननगर पुणे याचे बरोबर दिनांक २६/०५/२०१९ रोजी दुपारी १२/०० वा ते १/०० वाजता जलतरण तलाव खराडी पुणे येथे गेला असताना व माझे मुलगा प्रतिक रमेश बनसोडे वय २६ वर्षै यास पोहता येत नसताना तेथील जलतरण चालविणारे इसम नामे शेखर मल्हारी जमादार वय २४ वर्षे रा. सर्व्हे नं.५६ समर्थनगर खराडी पुणे २. विजय संजय दळवी वय १९ रा. सदर, ३. जनक बहादुर बिष्टा वय ३० वर्षे रा. श्रीपार्क सोसायटी,चाटे शाळेजवळ, खराडी पुणे. यांनी फिर्यादी यांचा मुलगा तलावामध्ये पोहतांना निष्काळजी व हलगर्जीपणाने दुर्लक्ष केल्याने त्यांचा मुलगा तलावातील पाण्यात बुडून त्याचा मृत्यु झालेला आहे. वगैरे मजकुराची तक्रार दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दाखल गुन्हयातील आरोपींचा पोलीस उप निरीक्षक पिंगळे, त्यांचे दप्तरी पो ना दत्ता जाधव व तपास पथकातील पोलीस नाईक संजय आढारी, विष्णु गोणे यांनी शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे आणुन पोलीस उप निरीक्षक आठरे यांनी त्यांना दिनांक ३०/०५/२०१९ रोजी २०/०० वाजता दाखल गुन्हयात अटक करुन गुन्हा उकडकीस आणला आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक आठरे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.

(राजेंद्र पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर.